स.ब.वि.प्र. समाजाचे,

**सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात**
**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**

संगमनेर, जि. अहमदनगर ४२२ ६०५

Email : smbstcollege@gmail.com • Web : www.smbstcollege.com

ID No. PU/AN/ASC/035 (1990)

(नॅक पुनर्मुल्यांकन 'ब' दर्जा)



# अंतरंग

सन २०१८-१९

संपादक

**प्रा. तुळशीराम जाधव**

प्रकाशक

**प्राचार्य डॉ. आर. के. दातीर**

# पुणे विद्यापीठ गीत

## ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दुर
लाख-लाख कंठातुनि हाच एक सुर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हे पवित्र तिर्थ मानतो
हृदयातुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हें विश्वची घर अमुचे मंत्र हा महान






स्वातंत्र्य सेनानी, सहकारमहर्षी व दंडकारण्य अभियानाचे प्रणेते

# स्व. भाऊसाहेब संतुजी थोरात (दादा)



# मा. आमदार बाळासाहेब थोरात

माजी महसूल व शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य



# मा. आमदार डॉ. सुधीर तांबे

सदस्य, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य
चेअरमन, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर



# डॉ. आर. के. दातीर

प्राचार्य,
सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर

# ❊ प्राचार्यांचे मनोगत ❊

आपल्या 'अंतरंग' नियतकालिकाच्या प्रकाशनाबाबत या घडीला आनंद व्यक्त करावा की वियोगाची हुरहूर हे मला कळेनासे झाले आहे . कारण मी आता ३१ मे २०१९ रोजी निवृत्त होत असल्याने त्यानिमित्ताने आपल्याशी हा अखेरचा सवांद साधत आहे. तरीपण 'अंतरंग' च्या निमित्ताने शेवटची का होईना पण तुम्हा सर्वांशी संवाद साधण्याची ही शेवटची संधी म्हणून ती अधिक महत्त्वाची आहे असे मला वाटते , म्हणून मी आपल्याशी हे निमित्त साधून महाविद्यालयाच्या माझ्या कारकीर्दीच्या अडीच वर्षांच्या काळातील वाटचालीविषयी लिहिणार आहे.

आपल्या नियतकालिकाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत उतरवावे अशी माझी मनापासून इच्छा होती. पण त्यासाठी खास अशी कल्पना घेऊन विशेषांक काढावा लागतो. परंतु एखाद्या विशिष्ट विषयाला धरून विद्यार्थांकडून पुरेसे साहित्य येणार नाही असे संपादक मंडळाचे मत असल्याने मी ही तसा आग्रह धरला नाही. तरी या पुढेही आपण आपले हे नियतकालिक आपल्या विद्यापीठाच्या स्पर्धेत सहभागी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असावे असे मला सुचवावेसे वाटते. त्यासाठी मी तुम्हा विद्यार्थ्यांना असेच सांगेल की चांगले वाचा , चांगले ऐका , चांगले चिंतन करा मग पहा तुम्हाला आपोआप चांगले लिहिता येईल. तसेच माझ्या सहकारी प्राध्यापकांना असे सुचवील की त्यांनी साहित्य लेखनाची धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखनप्रेरणा मिळेल असे उपक्रम राबवावेत व विद्यार्थ्यांना लेखक , कवी होण्यासाठी धीर द्यावा. संपादक मंडळाने त्यांच्यापरीने हे नियतकालिक उत्कृष्ठ व्हावे यासाठी त्यांची जबाबदारी पार पाडण्याचा यथोचीत प्रयत्न केला आहे याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. पण याबाबत त्यांनी हे नियतकालिक प्रकाशीत करण्याच्या दृष्टीने कालमर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे असे मला प्रकर्षाने वाटते. 'कैझेन' या जपानी व्यवस्थापन तत्वाप्रमाणे जसे कुठल्याही कार्यात बुद्धिमान माणसाने सतत सुधारणेचा प्रयत्न केला पाहिजे तसाच प्रयत्न आपल्या अंतरंगच्या गुणवत्तेबाबतही असला पाहिजे असे माझे मत आहे. तसेच अंतरंग नियतकालिकासंदर्भात महाविद्यालयाच्या एकूण एक घटकाची भूमिका महत्त्वाची आहे हे पण सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. कारण महाविद्यालयाचे नियतकालीक हा महाविद्यालयाचा कायमचा नोंदविला जाणारा दस्तऐवज असतो. तोच भविष्यकाळातील कायमचा संदर्भ देखील असतो. म्हणून सर्व शैक्षणिक विभाग तसेच शिक्षणेतर समित्या-मंडळांनी या नियतकालिकात आपल्या कामकाजाचे व्यवस्थित प्रतिबिंब पडेल याची काळजी घेतली पाहिजे. परंतु असे शतप्रतिशत होताना दिसत नाही. यापुढे आपले नियतकालिक म्हणजे आपल्या महाविद्यालयाच्या वर्षभराच्या कामकाजाचा आरसा असतो हे लक्षात घ्यावे असे सर्वांना सुचवावेसे वाटते. सर्व शैक्षणिक तसेच शिक्षणेतर विभाग तथा मंडळांनी या नियतकालीकासाठी आपापले अहवाल देऊन जे काही सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

मला आपल्या महाविद्यालयात कामकाज करण्यासठी तसा फार मोजका कालावधी मिळाला. एकूण महाविद्यालयाच्या आयुर्मानाचा विचार करता अडीच वर्षे हा कालावधी म्हणजे तसा नगण्य कालावधी आहे. पण असा तोकडा विचार न करता मला आपल्या संस्थेने माझ्यावर विश्वास दाखवून जी काही प्राचार्य पदाची संधी दिली तिचा मी यथोचित विचार करून माझे कर्तव्य निष्ठेने पार पाडण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या अत्यल्प काळात मी संस्थेच्या सहकार्याने अनेक शैक्षणिक विकासाचे प्रकल्प मार्गी लावले.सर्वात महत्वाचे म्हणजे विज्ञान भवनाच्या उद्घाटनापासून पायाभूत सुविधांचा विकास. मग त्यात वाणिज्य विभागासह सर्व विज्ञान विभागांच्या प्रयोग शाळा तसेच त्या-त्या विभागांन लागणाऱ्या इतर अनुषंगिक सुविधा यांचा अंतर्भाव करता येईल. ग्रंथालय समृद्ध करण्यापासून ते जिमनेशीयम अधिकाधिक सोई सुविधांनी युक्त करण्यापर्यंत विविध सोईसुविधांचा विकास माझ्या परीने मी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात मग सौर उर्जेचा प्रकल्प, रुफ वॉटर हार्वेस्टिंग, ॲक्वा तंत्र ज्ञानासह पिण्याच्या पाण्याची सोय, के.बी.दादा सभागृहाचे नुतनीकरण, स्मार्ट क्लास रुम्स, कार्यालयीन कार्यकक्षांचे विस्तारीकरण, सर्व विभागांना पुरेसी जागा, संगणक प्रयोगशाळांचा विकास , इंटरनेट सुविधेचा विस्तार , सी. सी. टीव्ही कॅमेऱ्यांचे नुतनीकरण व विस्तार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र लेडीज कॉमन रुम इ.इ. अनेक बारीक सारीक सोई-सुविधा मी लक्ष पूर्वक उभ्या केल्या आहेत.

# ✻ प्राचार्यांचे मनोगत ✻

अर्थात एक गोष्ट निर्विवाद आहे ती म्हणजे या साठी आपल्या सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे सर्व पदाधिकारी माझ्यामागे खंबीरपणे उभे राहिले त्यामुळेच मी माझ्या अल्प काळात महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासासाठी बरेच काही साध्य करण्याचा प्रयत्न केला. आपले महाविद्यालय नॅक मुल्यमापनाच्या तिसऱ्या फेरीमध्ये आहे. महाविद्यालयास नॅकची 'ए प्लस'ग्रेड मिळावी असाच चंग बांधून मी माझ्या सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सहकार्यांना सोबत घेऊन युद्ध पातळीवर काम करण्याचा प्रयत्न केला. नॅकचा अहवाल देखील तयार झाला आहे. नॅकच्या मानांकनासाठी आता फक्त उपल माहितीची व्यवस्थीत पुनर्रचना करून तिचे प्रभावी सादरीकरण केले तर आपण अपेक्षीत मानांकन मिळवू शकतो असे मला वाटते . नॅकच्या मानांकनानिमित्त अपेक्षीत लक्ष्य गाठण्यासाठी काही अनुषंगिक महत्त्वपूर्ण गोष्टीही आपण धडाडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये 'आय एस ओ'मानांकन असेल , शैक्षणिक व प्रशासकीय लेखा परीक्षण ( AAA) असेल, ग्रीन ऑडीट असेल किंवा बेस्ट कॉलेज अवार्ड असेल या सर्व बाबी नॅक साठीच अतिशय वेगानेच पूर्ण करण्याचा आपण प्रयत्नकेला. त्यात आपले समाधानकारक काम झाल्याचे वाटते. विविध विभागांच्या शैक्षणिक वाटचालीतही मी सजगतेने लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात विद्यार्थी विकास मंडळाचे उपक्रम , एन.एस.एस. आणि एन.सी.सी. चे उपक्रम यांचीही भरीव कामगिरी होईल याची काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. विविध शैक्षणीक व शिक्षणपूरक विषयांवरील कार्यशाळा , राज्यस्तरीय ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रे , शैक्षणिक विभागांचे विद्यार्थी प्रशिक्षण वर्ग , मान्यवरांच्या महाविद्यालयास भेटी , तज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन , शैक्षणिक सहलींचे आयोजन या सर्व गोष्टी सुव्यवस्थीत , सुरळीत पार पडतील या दृष्टीने मी संबंधीत सहकाऱ्यांना पाठबळ दिले . त्याबाबत ताठर भूमिका न ठेवता मी लवचिक राहून आपले सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पडतील याची पुरेपूर काळजी घेतली. दैनंदिन शैक्षणिक कामकाजात शिस्त व दर्जा रहावा याचीही मी

डोळ्यात तेल घालून काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये शिक्षकांच्या दररोजच्या तासिकांच्या निरीक्षण व पर्यवेक्षणापासून

ते अभ्यासक्रम पूर्ण होतात की नाही इथपर्यंत लक्ष दिले आहे. तसेच विद्यार्थी वर्गात बसतात की नाही इथपासून ते महाविद्यालयात शैक्षणिक दृष्ट्या क्रियाशील आहेत की नाही इथपर्यंत जागल्या सारखे सतर्क राहून विद्यार्थांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे. सारांश शिस्त, गुणवत्ताआणि पारदर्शकता या माझ्या त्रिसुत्रीप्रमाणे मी आपली वाटचाल करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे.

माझ्या या मनोगताचा शेवट करताना मला आपल्या सह्याद्री बहुजन विद्याप्रसारक समाज संस्थेच्या परिवाराचे ऋण व्यक्त केलेच पाहिजेत. मला आपल्या संस्थेने अगदी अल्पकाळासाठी का होईना जी संधी दिली , माझ्यावर विश्वासपूर्वक प्राचार्य पदाची जबाबदारी टाकली त्याबद्दल मी आपले लोकप्रिय लोकनेते मा. बाळासाहेब थोरातसाहेब , संस्थेचे विद्यमान चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबेसाहेब, सचिव मा.चंद्रकांत कडलग पाटील, सहसचिव मा. तुळशीनाथ भोर, खजिनदार मा. लक्ष्मणराव कुटे या सर्व पदाधिकाऱ्यांचे, सर्व संचालक मंडळाचे , संस्थेचे रजिस्ट्रार मा.बाबुराव गवांदे यांचे मी मनापासून आभार तर मानतोच पण सदैव त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. तसेच माझे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधूभगिनी यांनाही मी धन्यवाद देतो. माझ्या वाटचालीत जर माझ्याकडून कुणास काही त्रास झाला असेल तर त्याबद्दल मी दिलगीर आहे .मी जो तत्कालीन संवाद केला तो केवळ तेवढ्या कामासाठी होता , त्याबाबत मी माझ्या मनात कुठलाही नकारात्मक विचार ठेवलेला नाही व कुठलिही कटुता मी सोबत घेऊन चाललो नाही.आपणा सर्वांच्यात व माझ्यात अतूट असे प्रेमाचेच ऋणानुबंध राहतील अशीच माझी धारणा आहे. सर्वात शेवटी अंतरंगच्या संपादक मंडळाचे मी अभिनंदन करतो. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या या नियतकालिकात त्यांचे साहित्य दिले आहे , ज्यांनी उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी केल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे या नियतकालिकात फोटो झळकले आहेत त्यांचेही मी अभिनंदन करतो आणि आपणा सर्वांना यापुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सुयश चिंतितो. **धन्यवाद !**

**डॉ. आर. के. दातीर**
प्राचार्य

# * संपादकीय *



महाविद्यालयाचे नियतकालिक ही महाविद्यालयाच्या दृष्टीने नुसती महत्वाचीच नाही तर अप्रुप गोष्ट असते, असली पाहिजे. कारण तो महाविद्यालयाचा त्या वर्षाचा दस्तऐवज असतो. कारण संबंधीत वर्षाचा संपूर्ण लेखाजोखा त्यात मांडायचा असतो. त्यामध्ये सर्व शैक्षणिक विभागांचे संक्षिप्त स्वरूपात अहवाल तर असतातच पण सर्व अभ्यासक्रमेतर समित्या-मंडळे यांनी वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रम कार्यक्रमांचा अहवाल त्यात मांडलेला असतो. त्याशिवाय आपल्या महाविद्यालयाचे महत्वाचे पदाधिकारी, आपल्या संस्थेचे पदाधिकारी यांचाही एका नजरेत सचित्र परिचय त्यात अग्रक्रमाने करुन द्यायचा असतो. सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी केली आहे. त्यांचे वर्ग व नावानिशी फोटो छापलेले असतात. तसेच एन.सी.सी., एन.एस.एस. विद्यार्थी विकास मंडळ क्रिडा विभाग, आणि सर्व शैक्षणिक व शिक्षणेतर विभागांनी वर्षभरात जे कार्यक्रम केलेले असतात त्यांची क्षणचित्रे या नियतकालिकात छापलेली असतात. या सर्व माहितीसाठी महाविद्यालयाशी संबंधित प्रत्येक घटकाने उत्सुकतेने नियतकालिकाची वाट तर पाहिली पाहिजेच पण त्यासोबत त्यासाठी नीटनेटकी माहिती देण्याची जी जबाबदारी आहे ती पण पार पाडली पाहिजे.

नियतकालिकाचा अर्धाअधिक महत्वाचा भाग असतो तो म्हणजे विद्यार्थी लेखकांच्या साहित्याचा. महाविद्यालयीन शिक्षणामध्ये जेवढ्या भाषा शिकविल्या जातात, तेवढ्या भाषांमधून विद्यार्थ्यांचे लेखन येणे अपेक्षित असते. आधुनिक भारतीय भाषांपैकी आपल्याकडे मराठी, हिंदी,इंग्रजी एवढ्या भाषा शिकविल्या जातात. या सर्व भाषांमधून विद्यार्थ्यांचे लेखन येणे अपेक्षित असते. औपचारिक शिक्षणाची बारा वर्षे म्हणजे एक तपाचा काळ पुर्ण केल्यानंतर सर्वच शाखांच्या सर्वच विद्यार्थ्यांना नाही पण पंचवीस टक्के विद्यार्थ्यांना तरी आपले विचार, भावना अभिव्यक्त करण्याची साहित्यिक सक्षमता, लेखनकौशल्य प्राप्त व्हायला पाहिजे अशी अपेक्षा ठेवणं अवास्तव मानायला नको. पण प्रत्यक्षात भाषिक अभिव्यक्तीची वास्तव स्थिती फारच शोचनीय आहे. अगदी हाताच्या बोटावर मोजण्याची सुद्धा गरज पडणार नाही इतके खूप कमी विद्यार्थी साहित्यिक लिखानात रस घेतात. त्यासही दर्जाच्या कसोट्या लावल्या तर या गाळणीतून किती विद्यार्थी लेखक, कवी म्हणून शिल्लक राहतील हा मोठा यक्ष प्रश्न आहे. गेल्या २५ वर्षाहून अधिक वर्षाचे माझे निरीक्षण माझे असे सांगतोय की साहित्यिक अंगाने जाऊद्या पण पदवी घेण्यासाठी ते ज्या विषयांचा अभ्यास करतात त्या विषयांच्या परिक्षांमध्ये समर्पक हवी तेवढ्या प्रमाणात उत्तरे देण्यासाठी जी भाषिक क्षमता त्यांच्या अंगी निर्माण व्हायला हवी ती सुद्धा त्यांच्यात निर्माण होताना दिसत नाही.

विद्यार्थी लेखकांच्या प्राप्त साहित्याचा अभ्यास करता लक्षात येते की अगदी अत्यल्प विद्यार्थ्यांनी स्वतःचे म्हणून कविता, लेख आदि साहित्य स्वप्रतिभेने लिहून दिल्याचे दिसते. काही विद्यार्थी खुशाल दुसऱ्याची कविता स्वतः लिहिल्याच्या थाटात आणून देतात काहींनी कविता लिहिल्यात पण तिची नक्की विषय भावना कोणती याचा गोंधळ झालेला दिसतो. भावना व्यक्त करण्यासाठी उचीत शब्दयोजना झालेली दिसत नाही. भाषाशास्त्रीय दृष्ट्या शब्दाचा विशुद्धपणे वापर करता येणे अर्थवाही, तर्कशुद्ध वाक्यरचना करता येणे आणि एकूण लिखानाला अलंकाराचा साज चढवून आपलं लिखाणं सुंदर, लालित्यपूर्ण करणे ही जी भाषिक क्षमता आहे ती बारा पंधरा वर्षाच्या शैक्षणिक प्रवासातही संपादित होताना दिसत नाही. त्यामुळे आपले अंतरंग नियतकालिक म्हणावे तसे वजनदार व आकर्षक बनत नाही आपल्याला विशेष विषय (थिम) घेऊन आपले अंतरंग विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत उतरावयाचे आहे त्यासाठी आपण विद्यार्थ्यांच्या या साहित्यीक अंगाने हव्या असलेल्या भाषिक क्षमतांचा विकास होण्याची व सकस साहित्य प्राप्त होण्याची वाट पहात आहोत. अर्थात यासाठी आपल्याला महाविद्यालय पातळीवर काही प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांच्याच सहभागी विशेषतः भाषेच्या शिक्षकांच्या क्रियाशील सहभागाची आवश्यकता आहे.

ज्या-ज्या विद्यार्थी लेखकांनी, कवींनी या वर्षीच्या अंतरंग साठी आपले लेखन दिले त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. तसेच माझ्या सहसंपादकांनी त्यांच्या भाषा विभागाचे संपादनाचे काम जबाबदारीने केले मी त्यांना ही धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे सर्व शैक्षणिक विभाग व शिक्षणेतर मंडळे व समित्यांच्या प्रमुखांनी आपापले अहवाल देवून जे सहकार्य केले त्यांनाही धन्यवाद देतो आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचा या कामासाठी सदैव पाठीशी हात असतो. त्यांच्याप्रतिही मी आदर व्यक्त करतो.

जयहिंद, जय महाराष्ट्र !

**प्रा. तुळशीराम जाधव**
संपादक

# * महाविद्यालय विकास समिती *

अध्यक्ष



मा.आ.डॉ. सुधीर तांबे

सदस्य



मा. चंद्रकांत पा.कडलग

सदस्य



मा. बाबुराव गवांदे

सचिव



मा.डॉ. रामहरी दातीर

सदस्य



मा. कैलास सोमाणी

सदस्य



मा.डॉ. बबनराव आदिक

सदस्य



मा. अमोल शिंदे

सदस्य



प्रा. शिवाजी नवले

सदस्य



डॉ. विलास कोल्हे

सदस्य



प्रा. पांडुरंग चौधरी

सदस्य



डॉ. दत्तात्रय पवार

सदस्य



डॉ. शोभा बोऱ्हाडे

सदस्य



श्री. विनायक वाकचौरे

# * संपादक मंडळ *



**प्राचार्य डॉ. रामहरी दातीर**
प्रकाशक



**प्रा. तुळशीराम जाधव**
मुख्य संपादक



**प्रा. वर्षा साळवे**
विभागीय संपादक (मराठी)



**प्रा. संजय ब्राह्मणे**
विभागीय संपादक (इंग्रजी)



**प्रा. शशी साळुंखे**
विभागीय संपादक (हिंदी)



**डॉ. प्रमोदिनी कदम**
विद्यार्थी विकास अधिकारी



**डॉ. शोभा बोऱ्हाडे**
महाविद्यालय परिक्षा अधिकारी

## विशेष सहकार्य



**प्रा. शिवाजी नवले**
उपप्राचार्य



**प्रा. गोरक्षनाथ थोरात**
उपप्राचार्य



**श्री. गोरक्षनाथ पानसरे**
कार्यालय अधिक्षक



**प्रा. नामदेव ढोणे**
शिक्षक प्रतिनिधी



**डॉ. विलास कोल्हे**
आय.क्यु.ए.सी. समन्वयक



**डॉ. प्रमोद खैरे**
शारिरीक शिक्षण संचालक

## * एन.सी.सी. कॅडेटस् (मुले) *



**मेजर पांडुरंग चौधरी**
एन.सी.सी. ऑफिसर



**घुले गोकुळ मारुती**
अंडर ऑफिसर (आर.डी. कॅम्प)



**लांडगे योगेश देविदास**
अंडर ऑफिसर



**सार्जंट घुले आदित्य**
आर.डी. कॅम्प
विभागीय स्तरापर्यंत निवड



**सार्जंट काटे गोविंद**
एक भारत श्रेष्ट भारत
राष्ट्रीय शिबीरास निवड



**सार्जंट पिलगर सचिन**
एक भारत श्रेष्ट भारत
राष्ट्रीय शिबीरास निवड



**कार्पोरल कुटे चैतन्य**
आर.डी.कॅम्प विभागीय
स्तरापर्यंत बेस्ट कॅडेट निवड

## * एन.एन.सी. कॅडेटस् (मुली) *



**ले.डॉ. हेमलता राठोड**
एन.सी.सी. ऑफीसर



**कु. अक्षया घुले**
सिनिअर अंडर ऑफिसर



**कु. राजश्री मडके**
सार्जंट

## विशेष उल्लेखनीय अभिनंदन



**प्रा. तुळशीराम जाधव**
नोडल ऑफीसर,
(निवडणूक आयोगाकडून सन्मानीत)



**डॉ. संगिता दंडवते**
सायंटिस्ट ऑफ द इयर -२०१८
(आयएफइइ कोलकत्ता)



**डॉ. शोभा रहाणे**
पी.एचडी. उत्तीर्ण
(अर्थशास्त्र)



**डॉ. मिलिंद सकळकळे**
पी.एचडी. उत्तीर्ण
(गणित)

# * महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी *

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल २०१८ मध्ये वर्गात प्रथम आलेले विद्यार्थी



**रती जगदाळे**
प्रथम वर्ष (कला)



**उज्वला कदम**
द्वितीय वर्ष (कला)



**सुजाता देठे**
तृतीय वर्ष (कला)



**प्रज्ञा पवार**
एम.ए. (भाग-१)



**शांताबाई चौधरी**
एम.ए. (भाग-२)



**ऋतुजा जोंधळे**
प्रथम वर्ष (विज्ञान)



**माधुरी मोरे**
द्वितीय वर्ष (विज्ञान)



**अक्षया घुले**
तृतीय वर्ष (विज्ञान)



**ज्योती शिंदे**
एम.एस्सी. (भाग-१)



**दिपाली वर्पे**
एम.एस्सी. (भाग-२)



**अमोल हासे**
प्रथम वर्ष (बी.सी.एस.)



**सागर नवले**
द्वितीय वर्ष (बी.सी.एस.)



**प्रियंका नेहे**
तृतीय वर्ष (बी.सी.एस.)



**प्रियंका जाधव**
प्रथम वर्ष (वाणिज्य)



**आश्विनी गोर्डे**
द्वितीय वर्ष (वाणिज्य)



**शुभांगी गुंजाळ**
तृतीय वर्ष (वाणिज्य)

## * महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी *

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल २०१८ परिक्षेमध्ये वर्गात प्रथम आलेले विद्यार्थी



**मेघा भालेराव**
एम.कॉम. (ई-कॉमर्स) भाग-१



**सोनल गाडे**
एम.कॉम. (ई-कॉमर्स) भाग-२



**पूजा गुंजाळ**
एफ.वाय.बी.बी.ए.



**प्रगती कानवडे**
एस.वाय.बी.बी.ए.



**सागर शेलार**
टि.वाय.बी.बी.ए.



**शाहिस्ता सय्यद**
एफ.वाय.बी.सी.ए.



**यश गाडेकर**
एस.वाय.बी.सी.ए.



**गणेश कदम**
टी.वाय.बी.सी.ए.



**वर्षा गुंजाळ**
एम.सी.ए. (भाग-३)



**पल्लवी कांगणे**
निवडणूक आयोग कॉलेज ॲम्बेसॅडर



**ऋषीकेश बास्ते**
आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी
गुजरात विद्यापीठात निवड



**सुरज पर्बत**
ग्रंथालय सेवक
शरीरशौष्ठव स्पर्धेत विशेष प्राविण्य



**निरोगी मन आणि
सशक्त मनगट दोन्हीही
सोबत असतील
तर यश हमखास मिळते.**

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरिक्षण करण्यासाठी आलेल्या पुण्याच्या सीडा संस्थेचे मा.डॉ. गोसावी व मा.डॉ. बीना इनामदार यांच्या समवेत पहिल्या रांगेत प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रो. गोरक्ष थोरात, नॅक समन्वयक डॉ. विलास कोल्हे व महाविद्यालयाचे प्राध्यापक–प्राध्यापिका व कर्मचारी वृंद

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित आनंद मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी मा.सौ. शरयु देशमुख यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर सोबत स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. प्रमोदिनी कदम, आनंद मेळावा समितीचे प्रमुख डॉ. मिलिंद सकळकळे व उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले.





वार्षिक स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शन कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेताना महाविद्यालयाचे विद्यार्थी–विद्यार्थीनी

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केशरचना स्पर्धेतील स्पर्धकांच्या विविध केशरचनांचे परिक्षण करताना परिक्षक मा.सौ. कोमल राजपाल व मा.सौ. औटी समवेत प्राचार्य डॉ. आर.के.दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले व स्पर्धा संयोजक प्राध्यापिका





वार्षिक स्नेहसंमेलनात मेहंदी रचना स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धक आपल्या मेहंदी रचनांचे प्रदर्शन दाखविताना. मध्यभागी परिक्षिका मा.सौ. शितल कानवडे व स्पर्धा संयोजक प्राध्यापिका प्रा. रोहिणी जाधव, डॉ. शोभा रहाणे व इतर

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित पाककला स्पर्धेत पाककलांचे परीक्षण करताना परिक्षक मा.सौ. अर्चना काळे व समितीच्या प्राध्यापक सदस्या.

पुष्परचना स्पर्धेतील पानफुलांच्या रचनेचा अविष्कार उपस्थित प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, परिक्षिक मा.सौ. सोनाली शिंदे उपप्राचार्य प्रा. नवले व स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. प्रमोदिनी कदम मा. आबासाहेब शिंदे व इतर समिती सदस्य





वार्षिक स्नेह संमलनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेतील रचनांचे परिक्षण करताना मा.सौ. निर्मलाताई गुंजाळ, मा.सौ. शारदा सातपुते, मा.सौ. सिमा कराड सोबत स्पर्धा संयोजन समितीच्या प्राध्यापिका

विविध गुण स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे रजिस्ट्रार मा.बी.आर. गवांदे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य प्रा. नवले,सोबत संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पाटील कडलग, प्राचार्य डॉ. दातीर, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात, कलामंडळ प्रमुख डॉ. पुर्णिमा साबळे व स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. प्रमोदिनी कदम







शै.वर्ष २०१७–१८ च्या पदवीग्रहण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन मार्गदर्शन करताना उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. ठाकरे एन्.के., मंचावर स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन डॉ. सुधीर तांबे, संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य डॉ. दातीर, उपप्राचार्य व महाविद्यालयाचे विभाग प्रमुख.

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



स.ब.वि.प्र. संस्थेचे संचालक व संगमनेर तालुक्याचे लाडके नेतृत्व मा.आ. बाळासाहेब थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, समवेत स.ब.वि.प्र. संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग



स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबे, रजिस्ट्रार बी.आर.गवांदे व प्राचार्य डॉ. आर.के. दातीर व इतर



कलामंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना संगमनेरचे रंगकर्मी मा. सुर्यकांत शिंदे, मंचावर कलामंडळ चेअरमन डॉ. पुर्णिमा साबळे, शाहीर तुळशीराम जाधव, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात, सदस्य प्रा. लक्ष्मण घायवट



कला मंडळाच्या उद्घाटन समारंभात पथनाट्य सादर करतांना विद्यार्थी संचित भारती व समूहातील विद्यार्थी–विद्यार्थीनी



भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी मनोगत व्यक्त करताना प्रा. तुळशीराम जाधव सोबत स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग, रजिस्ट्रार बी.आर. गवांदे, प्राचार्य डॉ. दातीर, प्राध्यापक व विद्यार्थी

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



राष्ट्रपती महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी त्यांच्या चरित्रावर मार्गदर्शन करताना नाशिकचे डॉ. सोनवणे, मंचावर स.ब.वि.प्र. समाजाचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग, रजिस्ट्रार मा. बाबुराव गवांदे, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात व डॉ. शोभा राहाणे.

बहि:शाल शिक्षण मंडळाच्या ज्ञानवाचन चळवळ कार्यक्रमात साभिनय संवाद साधताना प्रा. योगेश रोकडे समवेत डॉ. गोकुळ क्षीरसागर





बहि:शाल शिक्षण मंडळाच्या डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत 'स्मरणशक्ती विकास' या विषयावर व्याख्यान देताना श्री. विलास दिघे मंचावर उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले व केंद्र कार्यवाह डॉ. त्रिंबक राजदेव.

'ग्रीन कॅम्पस' अंतर्गत वृक्षारोपण करतांना स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबे समवेत प्राचार्य डॉ. दातीर, प्रा. नामदेव डांगे, डॉ. बाळासाहेब वाघ, प्रा. चांगदेव शिंदे, कार्यालय अधिक्षक श्री. गोरक्ष पानसरे





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर.के.दातीर समवेत डॉ. बालाजी घारोळे, महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रमोदिनी कदम, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. सुहास आव्हाड

# ❋ महाविद्यालयातील विविध उपक्रम ❋



नाशिकचे दिवंगत कवी भिराव कोते, ''वर्गातल्या पोरी कुठं गेल्या?'' ही हृदयाचा ठाव घेणारी आपली कविता महाविद्यालयातील कवी संमेलनात सादर करतांना.

महाविद्यालय आरोग्य समितीच्या मार्गदर्शन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. विकास पाचोरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, समवेत डॉ.सौ. विशाखा पाचोरे, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, शाहीर तुळशीराम जाधव, समिती प्रमुख प्रा. प्रभाकर गायकवाड





आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयाच्या सेवेक वृंदाशी संवाद साधताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर समवेत योग मार्गदर्शिका डॉ. कमल ढाकणे, शारिरिक शिक्षण संचालक डॉ. प्रमोद खैरे, मेजर पांडुरंग चौधरी, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण घायवट

महाविद्यालय आय.क्यु.ए.सी. च्या व्याख्यानमालेत नॅक मानांकनावर मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. व्ही.बी. गायकवाड यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर मंचावर रजिस्ट्रार मा. बी.आर. गवांदे, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात







आय.एस.ओ. ९००१:२०१५ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करताना आय.एस.ओ. मार्गदर्शक डॉ. राजेंद्र जैन व त्याचा स्विकार करताना स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग, रजिस्ट्रार मा. बाबुराव गवांदे प्राचार्य डॉ. आर.के. दातीर व महाविद्यालय आय.एस.ओ. समितीचे समन्वयक डॉ. सुहास आव्हाड

# ❋ महाविद्यालयातील विविध उपक्रम ❋



वाणिज्य शाखेला एफ.वाय.बी.कॉम. वर्गाची दुसरी तुकडी, एम.एस.सी. इन ऑरगॅनिक या अभ्यासक्रमास मान्यता देण्यासाठी आलेल्या (एल.आय.सी.) समिती सदस्यांचा सत्कार करताना रजिस्ट्रार मा. बी.आर. गवांदे, संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा.कडलग, प्राचार्य डॉ. दातीर व उपप्राचार्य गोरक्ष थोरात



महिला तक्रार निवारण समितीच्या कायदेविषयक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा.ॲड. ज्योती मालपाणी मंचावर समितीच्या प्रमुख डॉ. कमल ढाकणे, ॲड. तब्बसुम शेख, व विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रमोदिनी कदम




पालक मेळाव्यात पालकांचे प्रतिनिधी श्री. अरविंद गाडेकर मनोगत व्यक्त करताना, मंचावर स.ब.वि.प्र. समाजाचे रजिस्ट्रार मा. बाबुराव गवांदे, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्रचार्य प्रा. नवले, समिती प्रमुख प्रा. लक्ष्मण गुंजाळ




माजी विद्यार्थी मेळाव्यात मनोगत व्यक्त करताना माजी विद्यार्थीनी, मंचावर स.ब.वि.प्र. समाजाचे रजिस्ट्रार मा. बाबुराव गवांदे, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, संस्थेचे खजिनदार मा. लक्ष्मणराव कुटे, माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख डॉ. बाळासाहेब वाघ व संघाचे सदस्य



सक्तीच्या आरोग्य तपासणीसाठी आलेल्या विविध डॉक्टर्स सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, आरोग्य तपासणी समितीचे प्रमुख प्रा. प्रभाकर गायकवाड व सदस्या प्रा. निलोफर तांबोळी.

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



स्वातंत्र्य दिनाच्या राष्ट्रीय उत्सवानिमित्त राष्ट्रध्वजाला वंदन करताना स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबे समवेत संस्थेचे रजिस्ट्रार. मा. गवांदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दातीर, मेजर पांडुरंग चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बी.के. शिंदे सर व अन्य मान्यवर



व्ही.व्ही.पॅट सह आलेले नवीन इ.व्ही.एम. मशिन समजुन घेताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी सोबत नायब तहसिलदार मा.श्री. रंधे साहेब, संस्थेचे चेअरमन आ.डॉ. सुधीर तांबे, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्रचार्य प्रा. शिवाजी नवले.



२६ जानेवारी २०१९ या प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांना संबोधीत करताना स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबे.



१५ ऑगस्ट २०१८ या स्वातंत्र दिनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यासाठी महाविद्यालयाच्या मैदानावर शिस्तबध्दपणे जमलेले एन.सी.सी. ची छात्रसेना, आणि कनिष्ठ व वरिष्ठ विद्यार्थी समुदाय.



'स्वच्छता पखवाडा' अंतर्गत स्वच्छतेचे सेवा कार्य करताना एन.सी.सी.चे छात्र, एन.सी.सी.च्या नगर कार्यालयाचे सेना अधिकारी, तसेच मेजर प्रा. पांडुरंग चौधरी सोबत उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात.

## * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरात मार्गदर्शन करताना स.ब.वि.प्र. समाज संस्थेच्या संचालिका, संगमनेर शहराच्या नगराध्यक्षा मा.सौ. दुर्गाताई तांबे, मंचावर पिंपळगावचे ग्रामस्थ श्री. बाळासाहेब मोरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनकर पवार, प्रा. वर्षा साळवे, प्रा. आबासाहेब पोकळे व प्रा. दिघे एन.डी.



राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने रिक्षा चालकांना राखी बांधुन रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला समवेत कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण घायवट, प्रा. स्नेहल थिटमे व इतर विद्यार्थीनी




राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संगमनेर तालुक्याच्या शिवारात वृक्षारोपण करताना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण घायवट, सहकार्यक्रम अधिकारी स्नेहल थिटमे, प्रा. विकास गुंजाळ व रासेयोचे स्वयंसेवक



विद्यार्थी विकास मंडळाच्या 'आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत' आग विझवण्याचे प्रात्याक्षिक करताना एन.सी.सी.चे कॅडेटस् व ते प्रात्यक्षिक पाहणारे महाविद्यालयाचे विद्यार्थी–विद्यार्थीनी.



रायफल फायरिंगचे प्रशिक्षण घेताना महाविद्यालयाच्या एनसीसी गर्लस् युनीटच्या कॅडेटस्

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *




एनसीसी युनीट च्या गर्लस कॅडेट्स रक्तदान करताना समवेत मेजर प्रा. पांडुरंग चौधरी व लेफ्टनंट डॉ. हेमलता राठोड

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या नोकर भरती प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. रतिकांत राय, मंचावर मा. आकाश नलावडे, सेलचे प्रमुख डॉ. दत्ता पवार त्यांचे सहकारी प्रा. जयराम डेरे, प्रा. इरफान चौगुले व प्रा. डॉ. दातीर





दिवंगत सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांना जन्मदिन 'प्रेरणा दिन' म्हणुन साजरा होत असतांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडतांना मा.प्रा. मा.रा. लामखडे मंचावर प्राचार्य डॉ. दातीर, मा. चंद्रकांत कडलग, मा. बाबुराव गवांदे, मा. बी.के. शिंदे सर, क्रिडा शिक्षक प्रा. सुधाकर उगले.

प्राचार्यांचे अभिभाषण–प्रथम वर्ष कला या वर्गाच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण व तदनुषांगिक सोई सुविधांची माहिती देतांना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर समोर पहिल्या रांगेत कला शाखेचे शिक्षक व विद्यार्थी–विद्यार्थीनी







विज्ञान मंडळाच्या पोस्टर्स व मॉडेल्स प्रदर्शनात विद्यार्थीनी कडून माहिती घेताना मा. गिरीषजी मालपाणी समवेत प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, मंडळाचे चेअरमन प्रा. विजयकुमार पांडे इतर प्राध्यापक–प्राध्यापिका व विद्यार्थी

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के. दातीर यांच्या सेवानिवृत्ती समारंभात त्यांचा सपत्नीक सन्मान करतांना, स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे चेअरमन मा.आ.डॉ. सुधीर तांबे माजी चेअरमन मा. लहानभाऊ गुंजाळ, विद्यमान सचिव मा. चंद्रकांत कडलग, खजिनदार मा. लक्ष्मणराव कुटे रजिस्ट्रार बी.आर. गवांदे

कौशल्याधारीत क्रेडीट कोर्स अंतर्गत पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल प्रा. सतीश कडलग यांचा सत्कार करताना रजिस्ट्रार बी.आर. गवांदे, प्राचार्य डॉ. दातीर, उपप्राचार्य प्रा. नवले, प्रा. थोरात व क्रेडीट बेस कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. गणेश थोरात, प्रा. नागरे







प्राध्यापक प्रबोधीनी अंतर्गत यशवंतराव चव्हाण यांच्या चरित्राबाबत मागदर्शन करताना प्रा. शिवाजी नवले मंचावर प्रबोधीनीचे चेअरमन प्रा. नामदेव ढोणे, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात

विद्यार्थी विकास मंडळाने आयोजित केलेल्या जैविक विविधता शिबिरात मागदर्शन करणाऱ्या मा. भाऊसाहेब चासकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. दातीर मंचावर उपप्राचार्य प्रा. थोरात डॉ. बाळासाहेब वाघ व विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रमोदिनी कदम






सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळा अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेताना एनसीसी चे छात्र व त्यांना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक

# ✻ महाविद्यालयातील विविध उपक्रम ✻



निर्भय कन्या अभियान कार्यक्रमात बीएसटी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींना आत्म संरक्षणाचे कराटे प्रशिक्षण देताना मा.श्री. मिलींद औटी मंचावर उपस्थित प्राचार्य डॉ. दातीर, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रमोदिनी कदम व डॉ. संगिता दंडवते.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना प्रा. तुळशीराम जाधव मंचावर प्राचार्य डॉ. दातीर आर.के. संस्थेचे रजिस्ट्रार बी.आर. गवांदे, उपप्राचार्य प्रा. नवले शिक्षक प्रतिनिधी प्रा. ढोणे व डॉ. प्रमोदिनी कदम





वक्तृत्व वादविवाद मंडळाच्यावतीने, ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज यांनी संतविचारांवर प्रवचन दिल्यावर त्यांचा सत्कार करताना स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत कडलग समवेत संस्थेचे खजिनदार मा. लक्ष्मणराव कुटे, प्राचार्य डॉ. दातीर, मंडळाच्या प्रमुख डॉ. साळुंखे शशी

कै.डॉ. माधवराव उमराणी स्मृतीचषक या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल बी.कॉम. चा विद्यार्थी अमोल उगले व उत्तम कथा लेखन केल्याबद्दल इंग्रजी विभागाची रति जगदाळे यांचे अभिनंदन करताना मा.डॉ. सुधीर तांबे व प्राचार्य डॉ. दातीर





महाविद्यालयाच्या इमारत क्र. ४ च्या गच्चीवर असलेले सौर उर्जेचे सयंत्र. सदर सयंत्र एम.एस.ई.बी. ग्रीडला जोडले असुन त्याद्वारे महाविद्यालय व एम.एस.ई.बी. यांच्या उर्जेची देवाण घेवाण होते, त्याची क्षमता ......... किलोवॅट अवर्स आहे.

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *



प्रथम वर्ष संगणक शास्त्र या वर्गाच्या स्वागत समारंभात मार्गदर्शन करताना विशिष्टाचार्य मा. बाबुराव गवांदे मंचावर स.ब.वि.प्र. समाजाचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात व संगणकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. इरफान चौघुले.




वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बाळासाहेब वाघ पॉवर पॉईंट तंत्राद्वारे विभागाच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करताना



रसायनशास्त्र विभागाच्या पोस्टर्स प्रदर्शनास भेट दिल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुण्याचे डॉ. रतिकांत राय समवेत प्राचार्य डॉ. आर. के. दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात, विभाग प्रमुख डॉ. शोभा बोऱ्हाडे



वाणिज्य विभाग आयोजित 'कृषी पर्यटन' विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण केल्यानंतर बीजभाषक मा.श्री. मनोज हाडवळे यांचा सत्कार करताना मा.आ.डॉ. सुधीर तांबे समवेत मा. चंद्रकांत कडलग, मा. बाबुराव गवांदे, मा.नारायणराव उगले, उपप्राचार्य प्रा. नवले, प्रा. थोरात, व प्रा. तुळशीराम जाधव



वाणिज्य विभाग आयोजित 'वित्तीय साक्षरता' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कार्पोरेट ट्रेनर डॉ. अविनाश क्षीरसाठ, समोर बसलेले विभागाचे प्राध्यापक व विद्यार्थी.

# ✻ महाविद्यालयातील विविध उपक्रम ✻



एम.कॉम. ई–कॉमर्स विभागातर्फे आयोजित कार्यक्रमातील मार्गदर्शक मा. सचिन अरगडे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, समवेत वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. तुळशीराम जाधव, समन्वयक प्रा. गणेश थोरात




अर्थशास्त्र विभागाच्या एकदिवसीय बहि:शाल शिबिरात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. डी.जी. उशे 'भारतातील कर सुधारणा' या विषयावर मार्गदर्शन करताना




सौ. नाईक यांनी 'योग व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर समवेत मा.डॉ. मुकुंद नाईक, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्षनाथ थोरात, मेजर पांडुरंग चौधरी, डॉ. दिलीप पोखरकर



हिंदी विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना एच.पी.टी. महाविद्यालय नाशिकचे डॉ. विजय प्रसाद अवस्थी, मंचावर उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात व हिंदी विभाग प्रमुख डॉ. शशी साळुंखे




इतिहास विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. सतीश देशमुख, मंचावर स.ब.वि.प्र. समाजाचे चेअरमन आ.डॉ. सुधीर तांबे, खजिनदार मा.लक्ष्मणराव कुटे, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ. त्रिंबक राजदेव व बीजभाषक डॉ. विंदा परांजपे.

# ✻ महाविद्यालयातील विविध उपक्रम ✻



डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आयोजित 'वाचन प्रेरणा दिनाचे' उद्घाटन करताना संगमनेर शहराच्या नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, समवेत प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, ज्युनिअर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बी.के. शिंदे, ग्रंथपाल सौ. सुर्वे मॅडम व इतर मान्यवर शिक्षक

मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'चित्रपट शो' कार्यक्रमात 'नटसम्राट' या हा चित्रपट पहाण्याचा आनंद घेताना मराठी विभागाचे विद्यार्थी.






गणित विभागाने घेतलेल्या गणित प्रश्नमंजुषेत प्रथम क्रमांक व विशेष प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात, विभाग प्रमुख डॉ. मिलिंद सकळकळे व इतर शिक्षक

संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेवर व्याख्यान देताना शाहीर प्रा. तुळशीराम जाधव, मंचावर प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमलता खरात






प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. विकास भांड पॉवर पॉईंटद्वारे अध्यापन करताना.

# * महाविद्यालयातील विविध उपक्रम *




इंग्रजी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या भाषा विकास कार्यक्रमाअंतर्गत 'इंग्रजीतील भाषा क्षमतेचा विकास' या विषयावर मार्गदर्शन केल्यावर डॉ. रोहीत कावळे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, समवेत इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. विलास कोल्हे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रमोदिनी कदम.



इंग्रजी विभागाच्या भाषा विकास कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संगमनेर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. उमेश जगदाळे



महाविद्यालयाच्या मैदानावर बॉस्केट बॉल खेळाचा आनंद घेताना विद्यार्थीनी



महाविद्यालयाच्या कुस्तीपट्टूंच्या स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. आर.के. दातीर समवेत उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, प्रा. गोरक्ष थोरात, महाविद्यालयाचे क्रिडा शिक्षक डॉ. प्रमोद खैरे, प्रा. कैलास पवार व मार्गदर्शक डॉ. विजयकांत बैरागी.



जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयातील क्रिडा स्पर्धेचे उद्घाटक स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत पा. कडलग यांचा सत्कार करताना उपप्राचार्य प्रा. शिवाजी नवले, मंचावर जिल्हा क्रिडा विभाग सचिव प्रा. नरोडे, महाविद्यालयाचे क्रिडा संचालक डॉ. प्रमोद खैरे.

# * महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व प्रशासकिय कर्मचारी वृंद *







सर्वात वरच्या फोटोत महाविद्यालयाच्या शिक्षिकांसोबत, मधल्या फोटोत शिक्षकांसोबत व सर्वात खालच्या फोटोत शिक्षकेतर कर्मचारी वृंदासोबत पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. मिर्झा बेग तसेच डावीकडून कार्यालय अधिक्षक श्री. गोरक्ष पानसरे, डॉ. प्रमोदिनी कदम, स.ब.वि.प्र. समाजाचे खजिनदार मा. तुळशीनाथ भोर, संचालक मा. शिवाजीराव थोरात, मा. मिर्झा बेग, प्राचार्य डॉ. आर.के. दातीर, स.ब.वि.प्र.समाजाचे माजी अध्यक्ष डॉ. सी.के. मोरे, उपप्राचार्य प्रा. गोरक्ष थोरात व प्रा. शिवाजी नवले

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- उज्ज्वल निकालाची वैभवशाली परंपरा
- उच्च विद्याविभूषीत तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक वृंद
- सर्व प्रकारच्या भौतिक सोयीसुविधा उपलब्ध
- विज्ञान शाखेसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा
- अद्ययावत संगणक विभाग
- समृद्ध ग्रंथालय व प्रशस्त वाचनकक्ष
- स्मार्ट क्लासरूम व वाय-फाय सुविधा
- अत्याधुनिक सेमिनार हॉल
- स्पर्धा परिक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र
- प्रशस्त जिमखाना, अद्ययावत जीमसह विविध खेळांच्या सुविधा
- प्लेसमेंट सेल सुविधा
- एन.सी.सी. (मुले व मुलींची स्वतंत्र युनिट्स)
- राष्ट्रीय सेवा योजना
- हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना
- तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, प्रात्याक्षिके व औद्योगिक भेटींवर भर
- योगा व समुपदेशन केंद्र.
- सॉफ्ट स्कील्स डेव्हलपमेंट प्रोग्राम.
- राज्यशासन पुरस्कृत कौशल्य विकास योजनांतर्गत मोफत कोर्सेस.
- वैयक्तिक मार्गदर्शन व विद्यार्थी पालकत्व.
- पदवी अभ्यासक्रम : विशेष स्तरावरील सर्व विषय शिकविण्याची सोय.
- पदव्युत्तर अभ्यासक्रम :
  - कला : अर्थशास्त्र, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास,
  - वाणिज्य : एम.कॉम.(रेग्युलर) व एम. कॉम-ई कॉमर्स.
  - विज्ञान : एम.एस्सी - ड्रग केमिस्ट्री आणि ऑरगॅनिक केमिस्ट्री.
- व्यावसायिक अभ्यासक्रम : बी.बी.ए. बी.बी.ए. (सी.ए.), बी.एस्सी. (संगणक शास्त्र)
- विद्यार्थीनींसाठी अद्ययावत वसतीगृहाची सोय.
- राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रवेश शुल्कात विशेष सवलत.
- सुंदर व प्रदुषणमुक्त परिसर.
- उत्कृष्ठ निकालाची परंपरा.
- झेरॉक्स, ई-मेल व इंटरनेट सुविधा.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची विशेष मार्गदर्शन योजना.

